# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## विद्यापीठ विकास विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२४
**Email :** bcud.gondwanauniversity@gmail.com
**web:**unigug.org

**जा. क्र/विविवि./ ०१ /२०१९** **दिनांक ०२/०१/२०१९**

**प्रति,**

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८–१९ साठी **mahadbt portal** वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ :– उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र.उशिसं–शा.सं.शिष्यवृत्ती/परिपत्रक/२०२९२/दि. १९/१२/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालय स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एचडी. करता यावी या उद्देशाने शासकीय संशोधन शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. करीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८–१९ साठी **mahadbt portal** वर ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहित करावे, हि विनंती.

सधन्यवाद!

सहपत्र :– संलग्नित पत्र

उपकुलसचिव (प्र)
विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

18


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं-२०१८/शा.सं.शिष्यवृत्ती/परिपत्रक/ 20292 दिनांक-१९/१२/२०१८

20 DEC 2018

परिपत्रक

**विषयः- शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**

**संदर्भः**-१) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजना विभाग क्र. एससीएच १०८२/४१९९/विशि-३ दि.१३ऑगस्ट, १९८५.

२) शासन निर्णय क्र. एस.सी.एच.२००३/(४०५/०३)/मशि-१ दि.०५फेब्रुवारी, २००४.

राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एचडी. करता यावी या उद्देशाने ही शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्ती संदर्भीय शासन निर्णय १ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी एकूण १४ संच निर्धारीत केलेले आहेत. त्याची विभागणी पुढीलप्रमाणे:-

| | |
|---|---|
| १) शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | ०३ |
| २) शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०३ |
| ३) शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद | ०३ |
| ४) शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती | ०१ |
| ५) वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ०१ |
| ६) राज्यांतील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांसाठी | ०३ |

**एकूण- १४**

Scanned by CamScanner

आपल्या महाविद्यालय/संस्था/विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी ऑन- लाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. मात्र या शिष्यवृत्तीसाठी अद्यापपर्यंत फार कमी प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे आपण सदर योजनेची प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

तसेच सन २०१७-१८ यावर्षी सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१८-१९ साठी नुतनीकरणाचा अर्ज mahadbt portal वर online भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. (पात्र विद्यार्थ्यांची यादी, संदर्भीय शासन निर्णय,संचालनालयाच्या**web: www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

तसेच सन २०१८-१९ मध्ये नवीन अर्ज सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीची माहिती देऊन mahadbt portal वर online अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहीत करावे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाकडून/संस्थेकडून या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिध्दी करावी.

९।१२

**(डॉ. मोहन खताळ)**
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत कार्यवाहीस्तव:-

१) सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई.
४) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर
५) संचालक, शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद.
६) प्राचार्य, शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती.
७) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर.

Scanned by CamScanner